औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची शनिवार दिनांक ३०.७.९४ रोजी झालेल्या ९३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वरराव भोसीकर | सभापती, औरंगाबाद मंडळ. |
| २] श्री. भास्कर मुंढे | उपसभापती औरंगाबाद मंडळ. |
| ३] श्री. दे. हि. सुन, उपसंचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग, औरंगाबाद. | सदस्य |
| ४] श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबरू चारठाणकर | सदस्य |
| ५] श्री. गायकवाड, शहर अभियंता मनपा औरंगाबाद, आयुक्त म.न.पा. यांचे | सदस्य प्रतिनिधी. |

विषय क्र. १: दिनांक २५.७.९४ रोजी झालेल्या ९२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

-x-

दिनांक २५.७.९४ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५६३

दिनांक २५.७.१९९४ रोजीच्या ९२ व्या बैठकीतील कार्यवृत्तांवर सविस्तर चर्चा होऊन सदरचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: सेलु जि. परभणी येथील सर्व्हे क्र. १४ या जमिनीपैकी १० एकर जमिन म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ५१ अंतर्गत खरेदी करणेबाबत.

----x----

या विषयाची बाब टिप्पणी म. उपसभापतींनी मंडळास वाचुन दाखविली. गेवराई जि. बीड येथील गृहनिर्माण योजनेस अल्प प्रतिसाद पाहता

सेलु येथील स.क्र. १४ या जमिनीपैकी १० एकर जमिन खरेदी करावी किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या मार्गदर्शनास्तव ठेवला असल्याचे म. उपसभापतींनी मंडळास सांगितले.

म. सदस्य श्री. देशपांडे यांनी या अनुषंगाने प्रतिपादन केले की, सेलु हे काही विकसीत झालेले शहर नाही अथवा औद्योगिक वसाहतही नाही. त्यामुळे सेलु येथे गृहनिर्माण योजनेस प्रतिसाद मिळणार नाही. करिता सेलु येथे जमिन खरेदी करणे इष्ट होणार नाही.

मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, जरी म्हाडाने सेलु येथील जमिन खरेदी करण्याची मान्यता दिली असेल परंतु "क" वर्ग नगरपरिषदेच्या हद्दीतील व तालुक्याच्या ठिकाणाच्या योजनेस मिळणारा अल्प प्रतिसाद पाहता सेलु या छोट्याशा गावातील जमिन खरेदी करुन म्हाडाचा निधी अडकुन ठेवणे योग्य होणार नाही. परंतु याबाबत म्हाडाचे मार्गदर्शन घ्यावे असे सदस्यांनी प्रतिपादन केले.

तसेच संबंधीत शेतक-यास सध्या जमिन खरेदी करण्याचे स्थगित केल्याचे कळवावे.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५६४

"क" वर्ग नगरपरिषद हद्दीतील व तालुका पातळीवरील गृहनिर्माण योजनांना मिळणारा अल्प प्रतिसाद तसेच स्थानिक परिस्थिती पाहता सेलु येथे गृहनिर्माण योजनेस प्रतिसाद मिळेल का याबद्दल शंका वाटते. त्यामुळे सेलु येथील स.क्र. १४ मधील १० एकर जमिन मंडळाने खरेदी करावी किंवा कसे याबाबत प्राधिकरणाकडून मार्गदर्शन घ्यावे.

तसेच संबंधीत शेतक-यांना कळवावे की, जमिन खरेदी करण्याचे तुर्त स्थगित केले आहे.

विषय क्र. ३: स.क्र. २४१, मुखेड जि. नांदेड येथील अल्प उत्पन्न गटातील ६६ गाळ्यांच्या योजनेसाठी प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेणेबाबत.

सदर विषयाची बाब टिप्पणी कार्यकारी अभियंता यांनी मंडळास वाचुन दाखविली व विस्तृत माहिती दिली.

मे. अनुयोग कंस्ट्रक्शन औरंगाबाद यांची मुखेड येथील बांधकामासाठी प्राप्त झालेली निविदा ३०% जादा [निम्नतम] प्राप्त झालेली आहे. सदर ठेकेदाराने मध्यंतरीच्या काळात २७.५% जादा या दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

या विषयावर चर्चा करतांना मंडळाच्या सभापतींनी मत प्रदर्शित केले की, २७.५% या दराने काम देणे हे मंडळास व अल्प उत्पन्न गटातील लाभधारकांना परवडणार नाही. तसेच गाळयाच्या किंमतीत बरीच वाढ होईल व पर्यायाने लाभधारकांवर आर्थिक बोजा पडेल.

चर्चे अंती मंडळाने संबंधीत ठेकेदाराशी वाटाघाटी करण्याचा निर्णय घेतला व सदर ठेकेदारास मंडळासमोर बोलविले.

मे. अनुयोग कंन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांचे प्रतिनिधी मंडळासमोर आल्यानंतर त्यांना मंडळातर्फे सांगण्यात आले की, निविदामध्ये आपण जो दर दिलेला आहे त्या दराने मंडळास काम देणे परवडणार नाही व गाळयांच्या किंमतीत वाढ होईल. त्यामुळे आपण दर कमी करावा.

मे. अनुयोग कंस्ट्रक्शन औरंगाबाद यांच्या प्रतिनिधींनी दर कमी करण्यास असमर्थता दर्शविली व आपल्या दराच्या समर्थनार्थ त्यांनी खालील बाबींचा उल्लेख केला.

१] मुखेड हे छोटे शहर आहे व तेथे कोणतेही बांधकाम साहित्य मिळत नाही व तेथे कोणत्याही सुविधा नाही. सर्व साहित्य नांदेड येथुन घेऊन जावे लागेल.

२] वाळु, खडी, डब्बर विटा इत्यादी साहित्य हे अंदाजे ८० कि.मी अंतरावरुन घेऊन जावे लागेल.

३] निविदामध्ये सिमेंट हे नांदेड येथुन मिळेल असा उल्लेख आहे. नांदेड येथुन मुखेड येथे सिमेंट घेऊन जाण्यास अधिकचा भार ठेकेदारास द्यावा लागेल.

४] D. S. R. व सिमेंटच्या Issue rate मध्ये टनामागे १०० रु.चा फरक आहे.

५] सदर ठेकेदाराने नमुद केले की, चालु दरसुचीत जरी वाढ करण्यांत आलेली नसेल परंतु महागाई निर्देशांक हा १३% वाढलेला आहे.

मे. अनुयोग कंस्ट्रक्शन यांच्या प्रतिनिधींनी मंडळास सांगितले की, या सर्व बाबींचा विचार करता मी निविदामध्ये दिलेला दर अर्थात नंतर कमी करुन दिलेला दर २७.५% हा योग्य आहे व त्याच दराने काम करण्याची तयारी दर्शविली.

त्यापेक्षा कमी दरात काम करणे शक्य होणार नाही असे त्यांनी सांगितले.

मे. अनुयोग कंस्ट्रक्शन यांच्या प्रतिनिधीशी चर्चा झाल्यानंतर मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, सदरची निविदा चालु दरसुचीवर २७.५% जादा या दराची आहे व मंडळास फक्त २०% पर्यन्त निविदा स्वीकारण्याचे अधिकार आहे म्हणून सदर निविदा मंडळास मंजूर करता येणार नाही. म्हणून सदर निविदा प्राधिकरणाकडे पाठवावी.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५६५

मे. अनुयोग कंस्ट्रक्शन औरंगाबाद यांची मुखोड येथील गाळ्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेली निविदा व त्यांनी नंतर कमी करून दिलेला दर २७.५% जादा या दराची असल्याने सदर निविदा प्राधिकरणाच्या मंजूरीस्तव पाठविण्यात यावी.

विषय क्र. ४: सर्वे क्र. आर ४३, सेक्टर एन-७ सिडकी औरंगाबाद येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत २६ गाळ्यांच्या उर्वरीत बांधकाम [भाग-१ व भाग-२] साठी प्राप्त झालेल्या निविदांवर निर्णय घेणेबाबत.

....

सदर बाब टिप्पणीवर चर्चा करतांना मंडळाच्या असे निदर्शनास आले की, भाग-१ व भाग-२ यासाठी प्राप्त झालेल्या निविदा या २०% पेक्षा जास्त असल्याने व मंडळास त्या स्विकारण्याचे अधिकार नसल्याने सदर निविदा प्राधिकरणाकडे पाठवावे असे मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले.

मंडळाने चर्चेअंती असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५६६

मे. अमीत बिल्डर्स औरंगाबाद यांनी २६ गाळे उच्च उत्पन्न गट या गाळ्यांच्या उर्वरीत बांधकामासाठी [भाग-१ व भाग-२ यासाठी] दिलेले दर प्रचलित दरसुचीवर २०% पेक्षा जास्त असल्याने सदर निविदा मुख्य अभियंता/प्राधिकरण यांचेकडे निर्णयास्तव पाठविण्यात याव्यात.

पटलावरील विषय संपल्यानंतर उपस्थितांचे आभार मानून बैठक संपली.

....